आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ फेब्रुवारी २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया दौऱ्यात उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या

- भारत-मलेशिया मैत्री आशिया प्रशांतमहासागर क्षेत्रातल्या शांती आणि विकासाकरता आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- 'विकसित भारत बँकिंग' संदर्भात, एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार

- महाराष्ट्रात १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान/ ७ हजार ४३८ इतके उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद

**आणि**

- आयसीसी क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडसमोर अफगाणिस्ताननं ठेवलं विजयासाठी १८३ धावाचं आव्हान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार्याबाबत चर्चा झाली. मलेशियाबरोबर भारताचं विशेष नातं असल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर संयुक्त निवेदनात व्यक्त केली. दहशतवादाविरोधात मित्र देशांना पूर्ण सहकार्य देण्याचं भारताचं धोरण असून त्याबाबत दुटप्पीपणा किंवा कोणतीही तडजोड होणार नाही असं मोदी यांनी स्पष्ट केलं.....

**- - - होल्ड- बाईट- मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय तंत्रज्ञान, आरोग्य, आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रात परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचा निर्धार दोन्ही पक्षांनी व्यक्त केला. आशिया प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता आणि विकास याउद्दिष्टांसाठी ही मैत्री आवश्यक असल्याचं मोदी म्हणाले.

या चर्चेपूर्वी प्रधानमंत्री मोदी यांचं पारंपरिक मानवंदना देऊन स्वागत करण्यात आलं.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेतले माजी सैनिक जयराज राजा राव क्वालालुंपूर इथं राहत असून त्यांची भेट प्रधानमंत्र्यांनी घेतली. भारताच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल राव यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं.

या द्विपक्षीय चर्चेनंतर  विविध क्षेत्रातल्या ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

दरम्यान, काल दौऱ्याच्या पहिल्या दिवशी प्रधानामंत्र्यांनी क्वालालंपूरमध्ये 'सेलामत दातंग मोदी जी' या भारतीय समुदायाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी मोदींनी भारत आणि मलेशियातील परस्पर नातेसंबंधांवर प्रकाश टाकला. यावेळी भारताचे युपीआय हे डिजीटल पेमेंट प्लॅटफॉर्म लवकरच मलेशियात सुरू होईल अशी घोषणा त्यांनी केली. त्याशिवाय प्रवासी भारतीयांसाठीच्या कार्डाची सुविधा सहाव्या पिढीपर्यंत वाढवण्यात आल्याचे सांगून, भारतात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तिरुवल्लुवर शिष्यवृत्ती सुरू करण्याची घोषणाही केली. त्याबरोबर मलेशियामध्ये नवीन वाणिज्य दूतावास सुरू करण्यात येईल असंही त्यांनी सांगितले.

या मेळाव्याला पंधरा हजार उपस्थिती होती.

**<><><><><>**

विकसित भारताच्या वित्तपुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम असे   मोठे वित्तपुरवठादार तयार करण्याच्या उद्देशानं, सरकार लवकरच ‘विकसित भारत बँकिंग’ संदर्भात, एक उच्च स्तरीय समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. विकसित भारताला वित्त पुरवठा करण्यासाठी बँकिंग व्यवस्था कशी सक्षम करता येईल याच्या उपाययोजना ही समिती सुचवेल अशी अपेक्षा असल्याचं निर्मला सीतारामन यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. ही समिती केवळ बँकांच्या विलीनीकरणापुरती मर्यादित नसून भारताची बँकिंग प्रणाली सक्षम बनवण्यवासाठी उपाय सुचवणं तिचा मुख्य उद्देश आहे, हे त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

गेले सलग तीन महिने भारताच्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेत असलेल्या परकीय गुंतवणुकदारांनी, फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्याच आठवड्यात पुन्हा एकदा ८ हजार १२९ कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केली आहे. अमेरिका आणि भारतात

झालेला व्यापारी करार आणि अर्थसंकल्पातल्या सकारात्मक तरतुदींमुळे परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

याआधी परकीय गुंतवणूकदारांनी जानेवारीमध्ये ३५ हजार ९६२ कोटी रुपये, डिसेंबरमध्ये २२ हजार ६११ कोटी रुपये आणि नोव्हेंबरमध्ये ३ हजार ७६५ कोटी रुपये बाजारपेठेतून काढून घेतले होते.

<><><><><>

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५ च्या प्राप्तीकर कायद्याशी संबंधित प्राप्तीकर नियम आणि अर्जांबाबत संबंधितांकडून सूचना मागवल्या आहेत. राष्ट्रपतींनी गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये या कायद्यावर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर आता येत्या १ एप्रिलपासून हा कायदा लागू होणार आहे.

या कायद्याविषयी अंतिम अधिसूचना जारी करण्यापूर्वी, कायद्याशी संबंधित प्रस्तावित प्राप्तीकर नियम आणि अर्ज इन्कमटॅक्स इंडिया डॉट जीओव्ही डॉट इन (incometaxindia.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. त्यावर भाषेचं सुसूत्रीकरण, कायदेशीर विवाद विषयक बाबी कमी करणे, कर अनुपालनविषयक भार कमी करणे तसंच कालबाह्य अथवा अनावश्यक नियम आणि अर्ज निश्चित करणे याबाबतीत संबंधितांच्या सूचना मागवल्या असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. या निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ७ हजार ४३८ इतके उमेदवारांचं भवितव्य काल मतदान यंत्रांमध्ये बंद झालं. आता उद्या सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू होणार आहे. मतमोजणीसाठी राज्य निवडणूक आयोगानं सुरक्षेसह सर्व व्यवस्था केली आहे.

या निवडणुकीसाठी काल एकूण ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के झालं. सर्वाधिक ७४ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान परभणी इथं तर रत्नागिरीत सर्वात कमी ५५ पूर्णांक ७९ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा तर पंचायत समित्यांच्या

१ हजार ४६२ जागांसाठी सर्व ठिकाणी शांततेत मतदान झालं अशी माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

<><><><><>

सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी, पाच दिवसांच्या भारत भेटीवर दाखल झाले आहेत. त्यांनी काल केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची भेट घेतली. त्याशिवाय भारतीय उद्योग महासंघाद्वारे आयोजित भारत-सेशल्स गोलमेज परिषदेत सहभाग घेतला. गेल्या पन्नास वर्षांत उभय देशांचे संबंध अधिक दृढ झाले असून, परस्पर सहकार्य वाढवण्यास उत्सुक असल्याचं प्रतिपादन हर्मिनी यांनी केलं. तर उभय देश परस्पर लोकसंपर्क, सागरी संबंधांवर आधारित विश्वासार्ह भागीदारी सामाईक करत असल्याचं मंत्री सोनोवाल यावेळी म्हणाले.

<><><><><>

इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेणार आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यामधल्या वाटाघाटींसंबंधी या भेटीत चर्चा होणार आहे.

इराणसोबतच्या कोणत्याही करारामध्ये त्यांच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमावर मर्यादा घालण्याचा आणि त्या संपूर्ण प्रदेशातल्या दहशतवादी गटांना इराणकडून मिळणारं पाठिंबळ थांबवण्याच्या अटींचा समावेश असायला हवा यासंबंधीचे मुद्दे नेतान्याहू मांडणार असल्याचं त्यांच्या कार्यालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना आज मुंबईच्या कुरार गावातून अटक करण्यात आली. मालाड पूर्वेच्या पठाणवाडी परिसरात दहशतवाद विरोधी पथकानं केलेल्या कारवाईत ही अटक करण्यात आली. या चारही बांगलादेशी नागरिकांनी कोणत्याही परवानगी शिवाय भारतात प्रवेश केला होता. त्यांच्याकडून बांगलादेशी नागरिकत्वाचे पुरावेही जप्त करण्यात आले असून त्यांना मायदेशी परत पाठवण्याची कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

'हिंदू' हे नाम नसून एक विशेषण आहे असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसवेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे. ते काल मुंबईत संघाच्या शताब्दी सोहळ्याते बोलत होते. भारतात कोणीही 'अहिंदू' नसून त्यांचं सध्याचा धर्म कोणताही असो, समान वंश आणि सांस्कृतिक वारसा ते अधोरेखित करतात असं ते म्हणले. 'हिंदू' हा शब्द बाहेरून लादलेली ओळख म्हणून पाहिला जाऊ नये, तर 'भारताच्या मूल्यांशी जोडलेल्या लोकांसाठी एक सर्वसमावेशक विशेषण' म्हणून पाहिले पाहिजे, ज्यात भूमीबद्दलचा अभिमान, तिच्या संस्कृतीबद्दलची प्रशंसा आणि पूर्वजांच्या सामायिक गौरव यांचा समावेश आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयसीसी क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत आज तीन सामने खेळवले जात आहेत. आजचा पहिला सामना ग्रुप डी मधील न्युझीलंड आणि अफगाणिस्तान यांच्यामध्ये चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर सुरू आहे. अफगाणिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत निर्धारित २० षटकात ६ बाद १८२ धावा केल्या. विजयासाठी १८३ धावाचं आव्हान घेऊन न्युझीलंडचा संघ फलंदाजीसाठी उतरला असून **शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या ८ षटकात २ बाद ७५ धावा झाल्या.**

विश्वचषकाचा दुसरा सामना ग्रुप सी मधील इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात होणार असून तो मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर दुपारी ३ वाजता सुरु होईल. तर आर्यलंड आणि श्रीलंका यांच्यातला ग्रुप बी चा सामना कोलंबोच्या केआर प्रेमदासा स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर काल अमेरिकेबरोबरचा सामना भारतानं २९ धावांनी जिंकला. भारताचा पुढचा सामना येत्या गुरुवारी १२ तारखेला नामिबियाबरोबर होईल.

**<><><><><>**

अबुधाबी मधला सर्वात मोठा क्रीडा महोत्सव अशी ओळख असलेल्या ओपन मास्टर्स क्रीडा स्पर्धेला सुरुवात झाली असून या स्पर्धेत ३० वर्षांवरील खेळाडू सहभागी होणार आहेत.

**//<><><><><>//**